## कंत्राटी पदभरती जाहिरात 2023-24

## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, अमरावती महानगरपालिका अमरावती

## 15 व्या वित्त आयोगा अंतर्गत कंत्राटी पदाकरीता पदभरती

राष्ट्रीय आरोग्य अभियान अमरावती अंतर्गत अमरावती महानगरपालिका अंतर्गत कंत्राटी पदे पदभरतीव्दारे भरावयाची आहे. याकरीता इच्छुक उमेदवारांनी सोबत जोडलेल्या अर्ज नमुन्यानुसार आवश्यक शैक्षणिक

| अ. क्र. | पदाचे नाव | एकुण रिक्त पदे | नियुक्तीचे ठिकाण | वय मर्यादा | शैक्षणीक अर्हता | प्रवर्ग | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Staff Nurse (कंत्राटी) | 18 | अमरावती महानगरपालिका | खुला प्रवर्गासाठी – 38 वर्ष<br>राखीव प्रवर्गाकरीता – 43 वर्ष<br>(NHM कर्मचारी 5 वर्ष शिथिल) | GNM / BSc Nursing with valid registration | अ.ज.(ST) - 2<br>भज-व(NT-B) - 1<br>इमाव (OBC) - 3<br>भज-क(NT-C) - 1<br>आदुघ (EWS) – 3<br>खुला (Open) – 8 | 20,000/- |
| 2 | MPW (कंत्राटी) | 17 | अमरावती महानगरपालिका | खुला प्रवर्गासाठी – 38 वर्ष<br>राखीव प्रवर्गाकरीता – 43 वर्ष<br>(NHM कर्मचारी 5 वर्ष शिथिल) | 12th Pass in Science + Paramedical Basic Training Course OR Sanitary Inspector Course | अ.जा. (SC) -1<br>अ.ज.(ST) – 1<br>विजा-अ (VJ-A) - 1<br>भज-व(NT-B) - 1<br>इमाव (OBC) - 2<br>भज-क(NT-C) - 1<br>आदुघ (EWS) – 2<br>खुला (Open) – 8 | 18,000/- |
| **एकुण भरावयाची पदे** | | | | | | 35 | |

**अर्ज सादर करण्याची पध्दत :-**

1.जाहिरात ऑनलाईन व वृत्तपत्रातुन प्रसिध्द केले जाईल.

2.तसेच अमरावतीचे वेबसाईट www.amravaticorporation.in वर जाहिरात उपलब्ध राहील. प्रत्यक्ष अर्जाची प्रत कार्यालयात आणुन दयावे. तसेच जिल्हयाबाहेरील असलेले उमेदवारांनी अर्ज पोस्टव्दारे या कार्यालयात पाठवावे. अर्ज पाठविण्याचा पत्ता – **अमरावती महानगरपालिका, सार्वजनिक आरोग्य विभाग (आवक-जावक कक्ष, शेवटची खोली), पंजाब नॅशनल बॅंकेचा वरचा माळा, राजकमल चौक, अमरावती. पिन कोड- 444601** येथे आणुन दयावा. अर्ज हे जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन 03./.11../2023 ते 09..../.11. /2023 कार्यालयीन वेळेत सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत आणुन दयावे. **अर्ज बंद पाकीट मध्ये असावेत, तसेच पाकीटवर – "राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान 15 वा वित्त आयोगा अंतर्गत .................................. – या पदाकारीता अर्ज असे नमुद करावेत".** कुठल्या पदाकरीता तदनंतर अर्जाची छाननी करून उमेदवारांची प्राप्त/अप्राप्त् यादी इत्यादी बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी अमरावती महानगरपालिका वेबसाईटवर www.amravaticorporation.in प्रसिध्द करणेत येईल. तसेच इतर कोणत्याही पध्दतीचा अवलंब करणेत येवू नये याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. यावावत पुनश्च वर्तमानपत्रामध्ये जाहीरात दिली जाणार नाही.

- उमेदवारांनी वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सर्व सुचना, गुणवत्ता यादी अमरावती महानगरपालिका वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येतील.
- आरोग्यवर्धिनी केंद्र कार्यान्वित झाल्यावरच नियुक्ती आदेश देण्यात येतील.

Scanned by CamScanner

<u>आवश्यक कागदपत्रे</u> - खालील आवश्यक कागदपत्रांची मुळ प्रतीची छायांकित प्रत स्वसाक्षांकीत करून अर्जासोबत सादर करणे अनविर्य राहील.

1) पदवी / पदविका प्रमाणपत्र
2) गुणपत्रिका (सर्व)
3) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्र
4) तांत्रिक पदाकरीता तत्सम कॉन्सीलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र
5) संगणक अहर्तचे प्रमाणपत्र
6) जातीचे प्रमाणपत्र
7) शाळा सोडल्याचा दाखला / जन्मतारखेचा दाखला
8) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र
9) पासपोर्ट आकाराचा फोटो

<u>अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक</u> :-
दि.03./..11.../2023 ते दि. दि.09./..11.../2023, सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत
<u>अर्ज सादर करण्याचे स्थळ</u> :- महानगरपालिका अमरावती, सार्वजनिक आरोग्य विभाग, राष्ट्रीय आरोग्य अभियान, अमरावती.

<u>अटी व शर्ती –</u>

1) वरील पदे ही पुर्णपणे कंत्राटी स्वरूपाची असुन 15 वित्त आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार त्यांचा कालावधी दि....../....../2023 पर्यंत मर्यादीत आहे. हा कालावधी वाढविला जाण्याची शक्यता आहे. परंतू सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागु नाहीत. (गज्यम्तरीय पत्र क्रं.110688-936, दि.03/01/2022)
2) ही पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरूपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत समावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्या संबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.
3) अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा, अर्जदाराविरूध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
4) उपरोक्त कंत्राटी पदाकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.
5) सदर रिक्त पदांच्या संख्येत, ठिकाण व मानधनात बदल होवु शकतो. याबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त तथा अध्यक्ष महानगरपालिका अमरावती यांनी राखून ठेवले आहे. ऐनवेळी मार्गदर्शक सुचनांनुसार पदसंख्येत बदल झालेस त्याबाबत उमेदवारांना आक्षेप घेता येणार नाही.
6) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.
7) एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.
8) जाहिरात प्रसिध्दीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी 38 वर्ष मागासवर्गीय प्रवर्गासाठी 43 वर्ष राहील.
9) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, भरती प्रक्रियेची माहिती अमरावती महानगरपालिकेच्या वेबसाईट www.amravaticorporation.in वर प्रसिध्द करणेत येईल, याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

Scanned by CamScanner

10) संबंधित पदाकरीता नोंदणी नंतर पात्र, अपात्र यादी प्रसिध्द दिनांकास कार्यालयात सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यासंबंधी आक्षेप नमुद दिनांकास सकाळी 10 ते 5 पर्यंत घेवून निराकरण केले जाईल. त्यानंतर प्राप्त आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

11) अर्जदाराला सोईनुसार ठिकाण बदलवुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

12) उमेदवारास एकापेक्षा जास्त पदाकरीता अर्ज सादर करावयाचे असल्यास प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज करावे लागेल. अर्ज करीत असलेल्या पदाचे नाव स सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचे प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावा आणि अर्ज हे सोबत जोडलेल्या नमुन्यातच सादर करण्यात यावे.

13) उमेदवारांनी अर्जासोबत कागदपत्रे अपूर्ण जोडल्यास उमेदवारास अपात्र ठरवल्या जाईल.

14) भरती प्रक्रिया स्थगिती देणे/रद्द करणे / पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त मनपा अमरावती यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

15) आरोग्य विभागाअंतर्गत 15 वा वित्त आयोगा अंतर्गत सदर निवड प्रक्रियेमध्ये त्याच संवर्गातील पदे रिक्त राहील्यास प्रतिक्षा यादीतुन उमेदवार घेण्यात येतील.

16) उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

17) सदर भरती प्रक्रिया पुर्ण झाल्या नंतर भविष्यात जर एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिल्यामुळे जागा रिक्त झाल्यास गुणानुक्रमाणे पुर्ण यादीतील मेरीट मधील पुढील उमेदवारास भरती प्रक्रिया न करता नियमानुसार नियुक्ती आदेश दिल्या जातील. सदर निवड यादी हि पुढील 1 वर्षापर्यंत वैध राहील.

18) मागासवर्गीय संवर्गातील उमेदवार उपलब्ध् न झाल्यास त्या पदावर इतर संवर्गातील उमेदवाराची तात्पुरत्या स्वरूपात निवड करण्यात येईल.

19) भविष्यामध्ये मा.उपसंचालक कार्यालय, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला यांच्याकडून विंदुनामावलीप्रमाणे आरक्षणामध्ये बदल झाल्यास उमेदवारांना कोणतीही पूर्व सुचना न देता कमी करण्यात येईल.

20) ज्या तांत्रिक संवर्गातील पदांना विहित केलेल्या केंद्रशासन अथवा राज्यशासनाच्या नोंदणी विभागाकडून वैध असलेले नोंदणी प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक असल्यामुळे अर्जासोबत वैध नोंदणी प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य राहील.

21) शासकीय सेवानिवृत्त अधिकारी यांचेकरीता वयोमर्यादा 62 वर्षे असेल. तसेच अनुभवास प्राधान्य असेल, वर्ग-3 व वर्ग-4 च्या पदावरून निवृत्त् झालेले कर्मचारी कंत्राटी पदावर अर्ज करण्यासाठी दि.17/12/2016 रोजीच्या शासननिणर्याव्दारे अपात्र आहेत.

22) सेवानिवृत्त उमेदवारांना मानधन शासननिर्णय क्रं. सकींर्ण – 2715/प्र.क्र./100/13 दि.17.12.2016 नुसार अदा करण्यात येईल.

23) सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालु किंवा प्रस्तावित नसावी कोणत्याही प्रकारे फौजदारी प्रकरण नसावे.

24) महाराष्ट्र नागरी सेवा नियम 2005 अन्वये लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र नमुना-अ या प्रपत्रात अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

25) उमेदवाराने अधिवास व राष्ट्रीयत्वाचे सक्षम अधिकाऱ्याकडून प्राप्त् केलेले प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

26) उमेदवाराने ए-4 आकाराच्या कागदावर संगणीकृत किंवा टंकलिखीत केलेल्या सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील अर्जातच परिपुर्ण माहीती भरून संपुर्ण आवश्यक दस्ताऐवजासह भरतीप्रक्रियेच्या वेळापत्राकानुसार पदनिहाय दिलेल्या पत्यावर नोंदणीकृत डाकेने अथवा सक्षम सादर करावे. नमुद मुदतीनंतर प्राप्त् झालेले अर्ज किंवा हरकती यांचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

Scanned by CamScanner

27) शासन निर्णय दि.13 जानेवारी 2009 नुसार खुला (अमागास) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्ग वगळता इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांनी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी दि.31 मार्च 2022 पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

28) पदभरती प्रक्रियेबाबत उमेदवारांना स्वतंत्रपणे लेखी स्वरूपात कळविण्यात येणार नाही. याबाबत www.amravaticorporation.in या संकेतस्थळावर वेळोवेळी होणाऱ्या प्रक्रियाबाबत जाहीर करण्यात येईल. याबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

29) राखीव प्रवर्गातुन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी अर्जासोबत जात प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येतील. कंत्राटी स्वरूपाची पदे असल्याने जात वैधता प्रमाणपत्रांची (caste validity) आवश्यकता नाही. तरी उमेदवारांनी अर्जासोबत जात प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.

30) उच्च शैक्षणिक अर्हताधारकास व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

31) सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा कोणत्याही प्रकारे फौजदारी प्रकरण नसावे.

32) राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना सदर पदाकरीता अर्ज करावयाचा असल्यास त्या कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यालय प्रमुखाची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील व तसे परवानगी पत्र सदर अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील, तसे परवानगी पत्र नसल्यास व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत असल्याचे निदर्शनास आल्यास सदर अर्जदाराचा अर्ज अपात्र करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

33) अर्जासोबत सादर केलेल्या छायांकित प्रत व मुळ दस्ताऐवज यांचेमध्ये तफावत आढळल्यास अथवा माहिती खोटी आढळल्यास उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल याची नोंदी घ्यावी.

34) वयोमर्यादा - i) उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास अर्ज केलेल्या पदाकरीता विहीत वयोमर्यादा आणि आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

ii) वय 18 पेक्षा कमी नसावे.

iii) अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिनांकास खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे वय 38 पेक्षा जास्त् नसावे व राखीव प्रवर्गातील उमेदवाराचे वय 43 पेक्षा जास्त नसावे.

iv) तसेच सेवा निवृत्त अधिपरिचारीका या पदाकरीता वय वर्ष 65 राहील तथापि सदर उमेदवारांना जिल्हा शल्य चिकित्सक प्रमाणित शारिरिक योग्यता प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

v) उमेदवारास 2 किंवा त्यापेक्षा कमी अपत्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. 2 पेक्षा जास्त अपत्य असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. तसे जाहिरातीमध्ये जोडण्यात आलेले प्रतिज्ञापण नमुना अ आपल्या स्वाक्षरीने जोडण्यात यावे.

35) खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती अर्जाच्या सोबत जोडाव्यात.

| | |
|---|---|
| 1)शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका | 2)राखीव उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र |
| 3)शाळा सोडल्याचा जन्म तारखेचा दाखला | 4)प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्रे |
| 5)पासपोर्ट आकाराचा फोटो | 6)शासकीय अनुभव असल्यास अनुभव दाखला |
| 7)लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र | 8)नावात बदल असल्यास गॅझेट (राजपत्र) जोडणे |

36) निवड यादीतील उमेदवारांना गुणनुक्रमानुसार नियुक्ती दिली जाईल. त्यावावत उमेदवारांनी कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

37) <u>निवड प्रक्रिया</u> -

मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दि.20.05.2022 रोजीचे पत्रानुसार खालीलप्रमाणे गुणकंण देण्यात येणार आहे.

Scanned by CamScanner

पात्र उमेदवारांना पुढील तक्त्यात नमुद केल्या प्रमाणे गुण देण्यात येणार आहेत.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे 70 प्रमाणे proportion काढावे. (उदा.60% गुण प्राप्त असल्यास त्याचे 70% प्रमाणे proportion = 60*70/100=42) | 70 गुण |
| पदाकरीता शैक्षणीक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधीत विषयामध्येच अधिकची शैक्षणीक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | अधिकत्तम 10 गुण दयावेत. (उदा.staff nurse पदासाठी BSc Nursing) करीता उमेदवाराने अर्ज केले असल्यास त्यास 10 गुण दिले जातील) | 10 गुण |
| एन.एच.एम. मधील कामाचा अनुभव असल्यास (किमान अनुभव 1 वर्ष) | प्रत्येक वर्षासाठी 4 गुण दयावेत. फक्त शासकीय संस्था विभाग यांचाच अनुभव ग्राहय धरावा. | 20 गुण |
| | **एकूण** | **100 गुण** |

वैद्यकिय आरोग्य अधिकारी
महानगरपालिका अमरावती

उपायुक्त (प्रशा.)
महानगरपालिका अमरावती

आयुक्त
महानगरपालिका अमरावती

Scanned by CamScanner